प्रहार
Like
2,026 people like this. Be the first of
Tweet 0
share



संध्या धुरी

**प री क्ष ण**

# औषधांचं 'भान' वाढवण्यासाठी...

**औषधांमुळे झालेला आजार बरा होतो. शरीर निरोगी ठेवता येतं. पण हीच औषधं जर चुकीच्या पद्धतीने, प्रमाणात घेतल्यास आपल्या जिवावर बेततात. याचं प्रमुख कारण आहे, सामान्यांना असणारी औषधांची अल्प माहिती. याला औषधांबाबतची निरक्षरताच म्हणता येईल. ही निरक्षरता दूर होऊन लोकांमध्ये औषधांविषयी जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न प्रा. मंजिरी घरत यांनी 'औषधभान' या पुस्तकातून केला आहे.**




परदेशात 'कन्झ्युमर मेडिसिन इन्फर्मेशन'ची संकल्पना चांगलीच रुजलेली आहे. या संकल्पनेंतर्गत ग्राहकांना औषधविषयक माहिती दिली जाते. ग्राहकांना औषधांच्या दुकानातून लेखी किंवा तोंडी माहिती फार्मासिस्ट देतो. नाहीतर औषध उत्पादन कंपन्याच प्रत्येक प्रॉडक्टबरोबर सोप्या भाषेतून रुग्णांसाठी माहितीपत्रक बनवतात. हे माहितीपत्रक 'पेशंट पॅकेज इन्सर्ट' या नावानं ओळखलं जातं. शिवाय ओव्हर द काउंटर (ओटीसी) औषधांच्या लेबलवरच सर्व आवश्यक माहिती सुवाच्य, सोप्या शब्दांत नमूद केलेली असते. आपल्याकडे औषधांविषयीची अशी माहिती रुग्णाला दिली जाते का? या प्रश्नाचं उत्तर असमाधानकारक आहे. अगदी आपल्याकडे २००९पासून 'औषध साक्षरता अभियान' सुरू होऊनही परिस्थितीत फारसा बदल झालेला नाही.

औषधाची साक्षरता आपल्याकडे निर्माण न होण्याच्या परिस्थितीला आपणच जबाबदार आहोत. कारण औषधांविषयी आपल्याकडे म्हणावी तशी जागरूकता नाही. ७० टक्के जनता औषधांच्या याविषयी लेखिकेने लिहिलेलं आहे.

'औषधभान' हे पुस्तक अशा कित्येक वैगुण्यांवर बोट ठेवत डॉक्टर आणि रुग्णाला आत्मपरीक्षण करायला भाग पाडतं. डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनवरील अक्षराबद्दल लेखिकेने 'वाचू या प्रिस्क्रिप्शन' असा मार्मिक लेख लिहिला आहे. डॉक्टरांचं अक्षर पेशंटला तीळमात्र लागत नाही. ते फक्त केमिस्टला समजतं, हे वास्तव आहे. त्याविषयी 'वाचू या प्रिस्क्रिप्शन'मध्ये एक विनोदही नमूद केला आहे. 'डॉक्टरने वेळोवेळी आपल्या पत्नीला लिहिलेल्या प्रेमपत्रांचं वाचन करणं तिला अशक्य होतं. अखेरीस ती प्रेमपत्रं केमिस्टकडून डॉक्टर पत्नीला वाचून घ्यावी लागतात.' या विनोदी विधानातील बोचक आणि खोचकपणा बरंच काही सांगून जातो.

पुस्तकात लेखिकेने लिहिलेल्या मनोगताचं शीर्षकच 'प्रवास औषध साक्षरतेचा' असं आहे. त्यात औषधसाक्षर होण्यासाठी काय प्रयत्न करता येतील याचं सविस्तर विवेचन आहे. लेखिकेने औषध साक्षरतेचा प्रसार आणि प्रचार जाणीवपूर्वक कसा अंगीकारला, हे तिने लिहिलं आहे. पुस्तकात

बाबतीत अत्यंत निरक्षर आणि निष्काळजी आहे. औषधं विकत घेताना आणि त्यांचं सेवन करताना काळजी घेतली जात नाही. घरी आणलेली औषधं काळजीपूर्वक ठेवलीही जात नाहीत. विकत घेतलेल्या औषधांची बिलं घेतली जात नाहीत. एक्सपायरी डेट तपासली जात नाही. औषधांची पाकिटं घरात कुठेही ठेवली जातात. या घरांना लेखिकेने औषधांचं 'भान' नसणारी घरं म्हटलं आहे. हे भान समाजात यावं, म्हणून 'फार्मोकॉलॉजी' या विषयाच्या व्याख्यात्या प्रा. मंजिरी घरत यांनी 'औषधभान' हे पुस्तक लिहिलं आहे.

औषधांचं भान नसण्यामागे अनेकदा आपल्याकडचे डॉक्टरही दोषी असतात, असं लेखिकेचं मत आहे. रुग्णाची औषधं तसंच आजारांविषयी अज्ञान कायम ठेवण्यात त्यांचाही हातभार लागलेला असतो. 'डॉक' या लॅटिन शब्दापासून 'डॉक्टर' हा शब्द तयार झाला आहे. वैद्यकीय उपचार करणारा तो डॉक्टर, असा लोकांचा सर्वसामान्य समज आहे. परंतु doc या शब्दाचा अर्थ शिक्षक असा आहे. म्हणजे डॉक्टरही शिक्षक असला पाहिजे. परंतु दैनंदिन जीवनात डॉक्टरची प्रतिमा वेगळीच आढळते. पेशंटची गर्दी, वेळेचा अभाव, कामाची व्यग्रता यामुळे बहुतांशी डॉक्टर पेशंट्सना पुरेसा वेळ देऊ शकत नाहीत. शिवाय ते कमीत कमी बोलतात. त्याचं कारण असं की, पेशंटलाही क्लिनिकमध्ये अधिक वेळ थांबवण्याची सवड नसते. त्यामुळे डॉक्टर आणि पेशंट यांच्यामध्ये जो संवाद व्हायला हवा तो होताना दिसत नाही. याविषयी डॉक्टरही विशेष उत्साही आढळत नाहीत. एकंदरीत 'डॉक' शब्दातला अभिप्रेत असलेला शिक्षक डॉक्टरमध्ये आढळत नाही. परिणामी संवादाविना उपचार होतात. हे वास्तव नाकारता येत नाही. त्यामुळे डॉक्टर आणि रुग्ण यांचे नातेसंबंध कसे असावेत, औषधांविषयीची प्राथमिक माहिती, औषधं विकत घेतानाची काळजी, औषधाची साठवण कशी असावी, सांगितल्यापासून वापर कसा केला जावा, औषधांची विल्हेवाट कशी लावावी, यांसारख्या विविध विषयांवर अत्यंत सोप्या शैलीत माहिती आहे. 'पील्स'चा वापर कसा धोकादायक आहे, यावरही पुस्तकात विस्ताराने भाष्य केलं आहे. तसंच कोलेस्टेरॉल, ॲसिडिटी (आम्लपित्त), ओबेसिटी (स्थूलता) या आजारांच्या औषधांविषयीही लेखिकेने स्वतंत्रपणे पुस्तकात लिहिलं आहे. जेवणापूर्वी, जेवणाच्या मध्ये आणि जेवणानंतर कुठली औषधं घ्यावीत याचेही काही नियम आहेत, याचीही माहिती लेखिकेने दिली आहे.

या पुस्तकातील शेवटचं प्रकरण पुन्हा 'औषधसाक्षरते'ला वाहिलेलं आहे. त्यातून औषधसाक्षरतेचा धावता आलेख मांडला आहे. आरोग्य आणि औषधविषयक विविध वेबसाइट्स दिलेल्या आहेत. पेशंटने डॉक्टरकडे जाताना तपासण्यांचे कुठले तपशील लिहून घ्यावेत, याचाही तक्ता दिलेला आहे. त्यात शस्त्रक्रियेपूर्वी रुग्णालयात दाखल होण्यापूर्वी रुग्णाने कोणती तयारी केली पाहिजे, डॉक्टरला काय सांगायचं, दवाखान्यातून घरी परत जाताना कोणती काळजी घ्यावी, असा सर्व तपशील आहे. तो प्रत्येकासाठी उपयुक्त आहे. यातून पेशंटचे किंवा डॉक्टरांचे दोष दाखवून द्यावेत, असा लेखिकेचा हेतू नाही. तसा कोणी गैरसमज करूनही घेऊ नये. औषध हे जीवनदायी व्हावं, यासाठी योग्य ती काळजी घेणं प्रत्येकाच्याच फायद्याचं आहे. हे भान आपल्याला 'औषधभान' देतं.

**औषधभान**
**लेखक :** प्रा. मंजिरी घरत
**प्रकाशन :** मेनका प्रकाशन
**पाने :** १२६ **किंमत :** १५० रुपये.

sandhya.dhuri@prahaar.co.in